
# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा धम्म आणि वाङ्मयीन चळवळ



SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

- संपादक -

**डॉ. विनोद अवधुतराव कोकणे**

एम.ए., बि.एड., एम.फिल., पीच.डी., नेट

- डॉ. आंबेडकरांचे सामाजीक–आर्थिक न्यायासाठी समाजवाद / 78
  प्रा. निलेश देशमुख
- डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे आर्थिक विचार / ८१
  डॉ. डि. एस.शाहापुरकर
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर व दलित साहित्य चळवळ / ९३
  डॉ.विनोद कोकणे
- डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिला सबलीकरण / ९८
  डॉ. सुधाकर सोनोने
- डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे जीवन, व साहित्य व कार्य
  प्रा.आर.डी.शिंदे / ११८
- Perception & Views of Dr. B.R. Ambedkar influencing the Indian Economic Culture. / १२६
  Nivrutti A. Pistulkar
  Social Justice Jurisprudence Under Indian Constitution
  **Nirajkumar D. Ambhore** / 134
- Emanicipation women in the novels of Angela Carter /147
  **Ajay N. Abhyankar**
- Dr. Babasaheb Ambedkar is the father of the Reserve Bank of India / 153
  **Dr. Rekha Lilhare**
- Ambedkar To The Overarching Context Of Indian Environmentalism.
  **Jayshree P.More** / 165
- Dr. Bhimrao Ambedkar's Role In Women Empowerment
  **Prof. Hemesh Nandkishor Joshi** / 169
- Role Of Dr.Babasaheb Ambedkar In Formation Of Modern India
  **Mr. Swapnil Rajeshrao Sonare / 177**
- डॉ. बाबासाहेव आंबेडकरांच्या परखड लिखाणामुळे धम्म वाढला
  प्रा.डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे / 184
- Dr. B. R. Ambedkar : Edifying The Modern Democratic India
  **Mahendra U. Ingole** / 189


SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISBN-978-93-89478-37-2

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या परखड लिखाणामुळे धम्म वाढला

प्रा.डॉ. गुणाजी पांडुरंग नलगे

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

**प्रस्तावना:-** शेकडो वर्षापासून अस्पृश्यांना, दलितांना आपले जीवन जगतांना नरक यातना सहन कराव्या लागत असत. माणूस म्हणून घेण्याचा आणि माणूस म्हणून जगण्याला कोणताही अधिकार नव्हता, अगदी पशु प्रमाणे आपले जीवन जगवा लागत असे. नव्हे पशुला तरी चांगली वागणूक दिली जात असे, पशुला खायला तरी पोटभर मिळत असे. पण दलितांना उपाशी पोटी, अर्धा पोटी जगावे लागे. पशुला किंमत होती पण दलितांना तेवढी ही किंमत नव्हती. समाजात चारचौघात बोलण्याचा अधिकार नव्हता बसण्याचा नव्हता, राहण्याचा नव्हता. पोटाची खळगी भरण्यासाठी दिवसभर काम करून सुद्धा शीळ-पात, उरले-सुरलेल, उस्टे-खरकटे अन्न यांना खावे लागत असे आणि आपले आयुष्य वेचावे लागत असे.या यातना, त्रास सहन करणारांनी आयुष्यभराच्या श्वासा इतकी, विश्व निर्मात्याला विनंती केली की, यातून आमची नय्या पार करणारा तारणहार निर्माण कर. तेव्हा विश्वकर्त्यांनी एका युगपुरुषाची निर्मिती केली ती म्हणजे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची.

यांच्या पदस्पर्शाने ही भूमि पावन झाली. बाबासाहेबांना स्वत: अमानुष वागणुकीला सामोरे जावे लागले. अस्पृश्यतेचे दहाकचटके सोसुन, अत्यंत हाल अपेक्षा सहन करून, अतिशय धैर्याने जगायला सुरुवात केली. बाबासाहेब लहानपणी शिकत असताना तहान लागली तरी स्पृश्य मुलाकडून पाणी मिळत नसे. भूक लागली तरी उरलेले अन्नपण मिळत नसे, वर्गात सोबत बसता येत नसे. चुकून स्पृश्य मुलांना स्पर्श झाला तर त्यांना अपमान सहन करावा लागत असे. प्रत्येक ठिकाणी स्पृश्य- अस्पृश्य अशा भेदभाव सहन करावा लागत असे. स्पृश्य मुला सोबत न बसणे, न बोलणे, ज्ञान न घेणे असे का केले जायचे तर बाबासाहेब हे महार जातीचे आहेत म्हणून तिरस्कार केला जायचा. ही



Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISBN-978-93-89478-37-2

SHIVAJI COLLEGE HINGOLI

बाबासाहेबांना, त्यांच्या विचारांना न पटण्यासारखे होते. सामान्य लोकांना फारसे सोयर- सुतक नव्हते. सहन करतील ते बाबासाहेब कसले. या अन्याया विरोधात आपल्या ज्ञानाच्या जोरावर आणि आंतरिक आत्मबलावर विश्वास ठेवून लोकशाही निर्माण केली. या तमाम समाजाच्या अस्मिते साठी विश्वव्यापी एक चळवळ उभी केली आणि त्याचे नेतृत्व स्वतःकडे घेतले. बाबासाहेबांनी बौद्ध धम्माचा स्वीकारच जाती व्यवस्थेच्या अंतासाठी आणि सामाजिक वा सांस्कृतिक परिवर्तनातून दलित समाज एक राजकीय जमात व्हावी आणि त्यातून एक राजकीय संघटन निर्माण व्हावे यासाठी केला. ही परिवर्तनवादी चळवळ चालवीत असताना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असे. बाबासाहेबांना प्रकर्षाने जी उनीव जाणवत होती ती म्हणजे अस्पृश्य दलित समाजाने शासन कर्ता जमात व्हायला पाहिजे आणि सारा भारत बौद्धमय व्हावा हे करण्यासाठी आपले सारे आयुष्य पणाला लावले. यातून धम्माचा प्रचार प्रसार वाढत गेला. धर्मांतर प्रक्रियेकडे आपणास सामाजिक, सांस्कृतिक परिवर्तनाचा टप्पा म्हणून बघावे लागेल.

बाबासाहेब एका ठिकाणी म्हणाले होते की "अस्पृश्य समाज हिंदूंचा भाग नसून भारताच्या राष्ट्रीय जीवन निष्ठेतील तो स्वतंत्र आणि ठळक असा एक घटक आहे, व हा सिद्धांत माझ्या राजकारणाचा पाया आहे." त्यातून त्यांना सामाजिक, सांस्कृतिक व राजकीय परिवर्तन घडवून आणायचे होते. ते पुढे लिहितात "बौद्ध धर्म स्वीकारल्यानंतर तुमची ही जबाबदारी मोठी आहे, लोकांमध्ये आदर वाढेल, सन्मान वाढेल अशीच कृती तुम्ही केली पाहिजे. धर्म म्हणजे गळयात मेड अडकवून घेत आहोत अशे समजू नका, आपण अगदी उत्तम रीतीने धर्माचे पालन करन्या बाबत विचार केला पाहिजे, नाहीतर महार लोकांनी तो निंदाजनक स्थितीत आणला अशे होता कामा नये. यासाठी आपण बौद्ध धम्मतत्त्वाचे पालन करणे व त्यानुसार आचरण करण्याचा दृढ निश्चित केला पाहिजे" असे विचार त्यांनी मांडले. बौद्ध समाजाने धम्मा ला धर्मात परावर्तित केले त्यामुळे बाबासाहेबांना अपेक्षित असणारा धम्म खऱ्या अर्थाने निर्माण झाला नाही. आंबेडकरांनी जातीव्यवस्थेच्या विरोधात चळवळ उभी केली. आंबेडकर यांच्या

T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISBN-978-93-89478-37-2

SHIVAJI COLLEGE HINGOLI

विचारावर चळवळी उभ्या राहिल्या, त्या चळवळींना आंबेडकरवादी चळवळ अशे नाव दिले. बाबासाहेब अतिशय बुद्धिमान होते त्यांचे वाचन फार मोठ्या प्रमाणावर होते आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यावरती आपले विचार लोकांसमोर मांडत असत. त्यांची भाषणे समाज परिवर्तना साठी, समाजातील अस्पृश्यता दूर करण्यासाठी आणि अंधश्रद्धा दूर करण्यासाठी अतिशय मोलाची होती. ते म्हणत कोणत्याही समाजाची उन्नती त्या समाजाच्या शिक्षणाच्या प्रगतीवर अवलंबून असते. आपले राजकारण यशस्वी करण्याकरिता आपल्या समाजा ने मोठ्या अधिकारांच्या जागा म्हणजे मी म्हणतो त्याप्रमाणे मानाच्या जागा काबीज केल्या पाहिजेत. तेव्हा कुठे आपला समाज प्रगती करेल. आपला पक्ष सोडून, संघ सोडून आपण जर तुटक पणाने राहिलो किंवा दुसऱ्यात सामील झालो तर आपला आत्मनाश अटळ आहे. आपण संघटित राहून संघर्ष केला तर आपले यश कुणीही हिरावू शकणार नाही. असे बाबासाहेबांचे आपल्या समाजाविषयी परखड विचार होते.

डॉ.आंबेडकरांनी समाजाविषयी, लोका विषयी आपले परखड मत मांडले आहे. अस्पृश्य वर्गाचा स्वाभिमान विद्यार्थी दशेतच मारण्यासाठी गांधींनी 1934 साली हरिजन सेवा संघ स्थापन केला. संघातून अस्पृश्यातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्याचा उपक्रम करण्यात आला. याचा हेतू एवढाच की तरुण विद्यार्थ्यांना आर्थिक आमिश दाखवून त्यांना स्वातंत्र्य संघटनेपासून ओढून आपल्या गोटात नेता यावे. असे गांधीजी विषयी आपले परखड मत आंबेडकरांनी मांडले आहे. अस्पृश्यातील जातीभेद व अस्पृश्यता नाहीशी करावयाची असेल तर धर्मांतर करणे हा एकमेव रामबाण उपाय आहे असे मत आंबेडकरांनी मांडले.जितकी स्वराज्याची आवश्यकता हिंदुस्थानला आहे, तितकीच धर्मांतराची आवश्यकता अस्पृश्यांना आहे. पुढे बाबासाहेब म्हणतात माणूस धर्मासाठी नाही तर धर्म माणसा करीता आहे. मी हिंदू म्हणून जन्माला आलो पण हिंदू म्हणून मरणार नाही.

**बाबासाहेबांचे शैक्षणिक विचार:-** जो मनुष्य शिकून मोठा होतो तो आपले मत ठामपणे मांडू शकतो. शिक्षणाने समाज परिवर्तन होते, कर्तव्याची जाणीव होते. अस्पृश्य समाजाला स्वतःची जाणीव व्हावी यासाठी शिक्षणाची गरज आहे. शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे ते जो पितो तो गुरगुल्याशिवाय राहत नाही. शिक्षणाने व्यक्ती बौद्धिक दृष्ट्या



T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISBN-978-93-89478-37-2

SHIVAJI COLLEGE HINGOLI

सशक्त होतो. प्रज्ञा, शील, करूणा ही शिक्षणाशिवाय अंगिकारता येणार नाही.

**जातीव्यवस्थेबद्दल विचार:-** भारतातील जाती व्यवस्था नष्ट करण्यासाठी सर्व जातींच्या लोकांनी वर्ण, धर्म, जात, लिंग यांचा भेदभाव न करता सर्व नागरिकांना समान अधिकार यासाठी आयुष्यभर काम केले. लोकांतील जातीपातीची दरी दूर करण्यासाठी लग्न खान-पान आणि सांस्कृतिक मिलाप या तीन गोष्टीत भेदभाव नसला पाहिजे. बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मूकनायक सारख्या पाक्षिकाची सुरुवात केली. हे पाक्षिक चालू करण्यासाठी छत्रपती शाहू महाराजांनी पैसे रूपाने मदत केली. डॉक्टर आंबेडकरच अस्पृश्य समाजाचा उद्धार करू शकतात आणि देशाचाही करू शकतात असे विचार व्यक्त केले. अस्पृश्यांना मिळणारे सामाजिक, राजकीय हक्कही कोणाच्या मर्जीव अवलंबून असू नयेत, ते सरकारने थेट अस्पृश्यांना द्यावेत. असे परखड मत डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी व्यक्त केले होते. भारता सारख्या देशात लोकशाही बद्दल आपले मत व्यक्त करताना त्यांनी संसदीय लोकशाहीचा स्वीकार केला. पुढे म्हणाले सामाजिक आणि आर्थिक लोकशाही प्रस्थापित झाल्याशिवाय राजकीय लोकशाही यशस्वी होणार नाही. लोकशाहीत विरोधी पक्ष खंबीर आणि प्रबळ असल्याशिवाय लोकशाही मजबूत होणार नाही असे मत त्यांनी व्यक्त केले. राजकारणातले भक्त हुकूमशाहीला जन्म देतात असा इशारा आंबेडकरांनी दिलेला होता. लोकशाही तत्त्वावर आधारलेली संविधानाची पायमूळ समाजात खोलवर जातील की नाही याबद्दल डॉक्टर आंबेडकरांना शंका होती. एडन क्रॉली यांनी जेव्हा आंबेडकर यांना विचारले की भारतात लोकशाही काम करेल असं वाटतं का? यावर डॉक्टर आंबेडकरांनी उत्तर दिले की "नाही ती फक्त नावापुरती असेल" असे ज्वलंत विचार व्यक्त केले.

**निष्कर्ष:-** डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी धम्मा चा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी आपले प्राण पणाला लावले. त्यांनी अस्पृश्य समाजासाठी दीन, दलित, बहुजनासाठी, यांना आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्याय देण्यासाठी पूर्ण आयुष्य वेचलं. ज्या धर्मात जन्माला आलो, त्या धर्मातील जाचक अटी आणि सामाजिक ,आर्थिक अन्याय दूर करून



T.C.
Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)

ISBN-978-93-89478-37-2

आपल्याला समाज सर्वश्रेष्ठ करण्यासाठी धर्म परिवर्तन केले आणि नवीन बौद्ध धम्म स्थापन केला. आपल्या धम्माची आचारसंहिता, तत्वज्ञान साऱ्या जगाला कसे चांगले आहे हे पटून सांगितले. धार्मिक आणि सामाजिक जोखडातून आपला समाज वाचविण्यासाठी, अन्याय दूर करण्यासाठी बौद्ध धर्माचे तत्वज्ञान साऱ्या जगाला सांगितले. उभ्या आयुष्यात अविरतपणे परिश्रम करून दलित, अस्पृश्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. स्वतः भोगलेल्या हाल अपेक्षा माझ्या समाज बांधवांना भोगाव लागू नयेत म्हणून संविधान निर्माण केले. देशात लोकशाही निर्माण केली त्यातून समाजा वरील अन्याय दूर करण्याचा प्रयत्न केला. आपल्या परखड विचारामुळे अनेकांशी वैर पत्करावे लागले, पण सत्य कधी सोडले नाही. त्यांच्या निर्भीड आणि स्पष्टपणामुळे धर्म परिवर्तनात 07 करोड लोकांनी बौद्ध धर्म स्वीकारला. जगात असे भूतो न भविष्यती घडले. जगात नाव झाले, बौद्ध धर्माची निर्मिती करू समाज बांधवांना न्याय दिला.

**संदर्भ सूची-**

1) डॉ. बाबासाहेब आंबेडकर- धनंजय कीर

2) बाबासाहेब आंबेडकरांची गाजलेली भाषणे, सुधीर प्रकाशन, वर्धा. (2007)

3) https://www.aksharnama.com>client

4) http://shodh.inflibnet.ac.in

5) https://mr.m.wikipedia.org.wiki

6) https://www.bbc.com>marathi

7) https://bolbhidu.com>dr.babasaheb

**संचालक, शारीरिक शिक्षण**

**आणि क्रीडा शिवाजी महाविद्यालय ,**

**हिंगोली 431513**

SHIVAJI COLLEGE HINGOLI

Assistant Professor
Shivaji College,Hingoli.
Tq.& Dist.Hingoli.(MS.)